




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे








•बीड(महाराष्ट्र) •वर्ष ५ वे •अंक १२७ •बुधवार, दि. ०६ ऑगस्ट २०२५ •RNI-MAHMAR/2021/80074 •Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 •पान १ •पाने ४ •किंमत ३ रूपये

• dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com • Mo. 9822152955


# उत्तरकाशीत मोठी दुर्घटना; ढगफुटी नंतर गावावर कोसळली दरड, 20 सेकंदात सर्वकाही उदध्वस्त

## भारतीय सैन्याचे 10 जवान बेपत्ता हेलिपॅड, लष्करी छावणीचंही नुकसान

वृत्तसंस्था

उत्तराखंडमधील उत्तरकाशी जिल्ह्यात मंगळवारी दुपारी दोनच्या सुमारास मोठी दुर्घटना घडली. हर्षिलवळील धराली गावात अचानक झालेल्या ढगफुटीमुळे प्रचंड मलबा वाहून आला आणि या मलब्यात शेकडो घरं गाडली गेली आहेत. त्यानंतर संपूर्ण परिसरात हाहाकार माजला. ही घटना भारतीय लष्कराच्या कॅम्पपासून केवळ चार किलोमीटर अंतरावर घडली असून, आतापर्यंत चार जणांचा मृत्यू झाल्याची अधिकृत माहिती समोर आली आहे, तर ६० हून अधिक लोक बेपत्ता आहेत. गंगोत्री धामचा संपर्क पूर्णतः तुटला आहे. पावसाचे पाणी आणि डोंगरावरून आलेला मलबा



इतक्या वेगात खाली आला की, संपूर्ण धराली गाव पाण्याखाली गेले. बाजारपेठा, हॉटेल्स, वाहने, घरे – सगळं काही पुराच्या पाण्यात वाहून गेलं. अशी आपत्ती मी याआधी कधीच पाहिली नव्हती. सगळं काही क्षणात नष्ट झालं, असं एका प्रत्यक्षदर्शिने सांगितलं.

ही दुर्घटना खीरगंगा परिसरात सात तालाजवळ हर्शिला पर्वतीय भागात घडली. धराली हे गाव उजव्या बाजूला असून, डाव्या बाजूला हर्षिलच्या तेलगाड भागात लष्कराचं कॅम्प आहे. या भागात त्यावेळी २०० हून अधिक स्थानिक आणि पर्यटक उपस्थित होते.

या नैसर्गिक संकटात भारतीय लष्कराचाही मोठा फटका बसला आहे. हर्षिलमधील १४ राजरिफ युनिटच्या कॅम्पला पुराचा फटका बसला असून, १० जवान आणि एक जेसीओ अद्याप बेपत्ता आहेत. एक अधिकारी जखमी झाला असून, त्याच्यावर उपचार सुरू आहेत. विशेष म्हणजे या आपत्तीतही लष्कराचे अधिकारी आणि जवान बचावकार्यात सहभागी झाले असून, आतापर्यंत त्यांनी १५ जणांचे प्राण वाचवले आहेत. याबाबत एका राष्ट्रीय वृत्तवाहिनीने वृत्त दिलं आहे.

या भागात नदीकिनारी असलेले हेलीपॅड देखील पुराच्या पाण्यात वाहून गेलं आहे, ज्यामुळे हेलिकॉप्टरमार्फत मदत कार्य करणे अशक्य झाले आहे. उत्तरकाशीहून धरालीकडे येणाऱ्या मार्गावर नेतला भागात भूस्खलन झाल्याने रस्ते बंद झाले आहेत आणि बाह्य मदत पोहोचणं अत्यंत कठीण बनलं आहे.

एसडीआरएफ, एनडीआरएफ, पोलिस, लष्कर आणि अन्य आपत्कालीन पथकांनी तातडीने मदतकार्य सुरू केले आहे. खीरगड नाल्याच्या पूरामुळे परिसरात आणखी नुकसान झाले असून, सर्वात आधी घटनास्थळी पोहोचलेले लष्कराचे जवान मदतकार्य करत आहेत. सध्या पूर्ण परिसरात मदतकार्यात अडथळे येत असून हवामानही साथ देत नाही. मात्र सर्व यंत्रणा याठिकाणी पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. हर्षिल आणि धराली परिसरात अडकलेल्यांची सुटका करण्यासाठी आणि मदत पोहोचवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत.

## तुकाराम मुंढेंची पुन्हा बदली, २० वर्षात २३ वेळा ट्रान्सफर; महत्वाच्या खात्यावर सचिव म्हणून नियुक्त

मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील धडाडीचे आयएएस अधिकारी अशी ओळख असलेल्या तुकाराम मुंढेंची (खड ढळज्ञरीरा चींपवश) पुन्हा एकदा बदली करण्यात आली आहे. २० वर्षांच्या सेवेत मुंडेंची २३ साव्यांदा बदली करण्यात आली आहे. नव्याने बदली करण्यात आल्यानंतर आता मुंढेंची दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई येथे नियुक्ती करण्यात आली आहे. मुंढे यांच्यासह राज्यातील पाच वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्याही (खड जषषळलशी) बदल्या करण्यात आली आहे.

कोणत्या अधिकाऱ्याची बदली कुठे ?

१. तुकाराम मुंढे (आयएएस: आरआर: २००५) विकास आयुक्त (असंघटित कामगार), मुंबई यांना सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले



आहे.

२. नितीन काशीनाथ पाटील (आयएएस: एससीएस: २००७) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक विपणन महासंघ, मुंबई यांना विशेष आयुक्त, राज्य कर, महाराष्ट्र, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

३. अभय महाजन (आयएएस: नॉन-एससीएस: २००७) विशेष आयुक्त, राज्य कर, महाराष्ट्र, मुंबई यांना व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य कापूस उत्पादक विपणन महासंघ, मुंबई म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

४. ओंकार पवार (आयएएस: आरआर: २०२२) सहाय्यक जिल्हाधिकारी, इगतपुरी उपविभाग, नाशिक यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

५. आशा अफजल खान पठाण - सहसचिव, मुख्यमंत्री सचिवालय, नागपूर यांना महासंचालक, वनमती, नागपूर म्हणून नियुक्त करण्यात आले आहे आणि त्यांना सहसचिव, मुख्यमंत्री सचिवालय, नागपूरचा अतिरिक्त कार्यभार देण्यात आला आहे.

▶▶ उर्वरित पान २ वर

## धनंजय मुंडे यांनी वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातून डोंगरतुकाई परिसरात सुरु असलेल्या कामांची केली पाहणी

### याच ठिकाणी दत्त गुरूंच्या श्री नृसिंह सरस्वती अवताराचे शक्तिस्थळ ; भाविकांच्या सोयीसह पौराणिक महत्त्व जपण्याच्या सूचना

परळी वै. । प्रतिनिधी

परळी शहरात श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्याच्या माध्यमातून डोंगर तुकाई परिसरात सध्या सुरू असलेल्या आंबा आरोग्य भवानी मंदिर तसेच श्री नृसिंह सरस्वती शक्ती स्थळ येथील विविध विकास कामांची माजी मंत्री तथा आमदार धनंजय मुंडे यांनी संबंधित अधिकारी व पदाधिकाऱ्यांच्या समवेत पाहणी केली. डोंगर तुकाई येथील श्री नृसिंह सरस्वती शक्ती स्थळ हे



दत्तगुरूंचे अवतार असलेल्या नृसिंह सरस्वती यांच्या वास्तव्याने पुनीत झालेले असून त्याचा उल्लेख गुरुचरित्रात सुद्धा आढळतो. गुहे सारखे असणारे हे शक्ती स्थळ व त्यावरील अंबा आरोग्य भवानी मंदिर या ठिकाणी भाविकांची, साधकांची योग्य सुविधा व्हावी त्याच बरोबर या स्थळाचे पौराणिक महत्त्व अबाधित राखून, दर्जेदार पद्धतीने कामे पूर्ण केली जावीत, अशा सूचना श्री मुंडे यांनी यावेळी संबंधित ▶▶ उर्वरित पान २ वर

## शहरातील धानोरा रोड, अंकुश नगर रस्त्यासंदर्भात आ.क्षीरसागरांनी घेतली बैठक

### दोन्ही रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याचे दिले निर्देश

बीड । प्रतिनिधी

शहरातील धानोरा रोड आणि अंकुश नगर रस्त्याची अक्षरशः चाळण झाली आहे. या भागातील नागरिकांना आणि येथून प्रवास करणाऱ्या प्रवाश्यांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे. त्यातच पाऊस पडल्यानंतर तर नागरिकांचे या रस्त्यामुळे अतोनात हाल होत आहेत. हा रस्ता करण्यासाठी काही दिवसांपूर्वीच या भागातील



नागरिकांनी आंदोलन केले होते. याची दाखल घेत आ.संदीप क्षीरसागर यांनी सार्वजनिक

▶▶ उर्वरित पान २ वर

## शिवसेना नेत्याच्या प्रमुख उपस्थितीत बीड जिल्हा पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक

### प्रमुख पदाधिकाऱ्यांनी उपस्थित रहावे: जगताप, मुळूक, गलध

बीड । प्रतिनिधी

विधानसभा निवडणुकीनंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचे बिगुल वाजणार आहे. राज्यात शिवसेनेला मिळालेल्या अफाट यशानंतर बीड जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्येही शिवसेनेचा भगवा फडकवण्यासाठी शिवसेना मोठ्या ताकदीने कामाला लागली असून उद्या दि. ७ ऑगस्ट २०२५ रोजी बीड शहरातील हॉ.



ग्रँड यशोदा येथे दु २.३० वाजता, धाराशिव येथील पदाधिकाऱ्यांची सायं. ४.०० वाजता आणि परभणी येथील पदाधिकाऱ्यांची सायं. ५.०० वाजता महाराष्ट्र राज्य उद्योगमंत्री उदयजी सामंत साहेब, शिवसेना उपनेते अर्जुनजी खोतकर साहेब, शिवसेना सचिव संजयजी मोरे साहेब, माजी खा. राहुलजी शेवाळे साहेब, शिवसेना सचिव भाऊसाहेबजी चौधरी साहेब,

▶▶ उर्वरित पान २ वर

## मोटारसायकल चोरी व जबरी चोरी प्रकरणातील दोन आरोपी बीड शहर पोलिसांच्या जाळ्यात



बीड । प्रतिनिधी

मोटारसायकल चोरी व जबरी चोरी करुन लुटमार करणाऱ्या दोन आरोपींना बीड शहर पोलीस ठाण्याच्या डिटेक्शन ब्रँच (DB) पथकाने अटक केली आहे. या कामगिरीमुळे शहरात पोलीस दलाच्या कार्यक्षमता व दक्षतेबद्दल समाधान व्यक्त होत आहे.

पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी शहरात वाढत्या मोटारसायकल चोरी व इतर चोऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सर्व ठाणेदारांना कडक सूचना दिल्या होत्या. या पार्श्वभूमीवर बीड शहर पोलिसांनी प्रभावी कारवाई करत दोन महत्वाचे गुन्हे उघडकीस आणले आहेत. डॉ. दिनेश भगवान तुपे (रा. आशापुरा अपार्टमेंट, बीड) यांची अवेंजर मोटारसायकल बीड सरकारी रुग्णालयासमोरून

▶▶ उर्वरित पान २ वर

## अजितदादा तुती लागवड ही वृक्षलागवड अंतर्गत येते का ?

### ३ वर्षांनंतर तोडण्यासाठी शेतकऱ्यांना वेगळी परवानगी घ्यावी लागणार का ? ? वृक्षतोड अंतर्गत गुन्हे दाखल तर होणार नाही ना ? मुख्यमंत्री, प्रधान सचिव उपमुख्यमंत्री यांना निवेदन : डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

हरित महाराष्ट्र अभियान अंतर्गत हरित बीड या संकल्पने दरम्यान दि.०७ गुरुवार उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांच्या हस्ते वृक्ष लागवडीचा शुभारंभ करण्यात येणार असुन या विक्रमाची इंडियन



बुक ऑफ रेकॉर्ड मध्ये नोंद करण्याचा जिल्हा प्रशासनाचा मानस असुन दरम्यान नरेगाच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या तुती लागवड ( रेशीम विकास) तब्बल ७ लाख तुती लागवड या अनुषंगाने वृक्ष लागवड सदरात तुती लागवड येते का ?तसेच ३ वर्षांनंतर शेतकऱ्यांना तुतीच्या लावलेल्या वृक्षाची तोडण्यासाठी शासनाची परवानगी घ्यावी लागेल का या विषयी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मार्गदर्शक सुचना करण्यात याव्यात. कारण तुती वृक्ष गृहीत धरला तर तोडणारांवर शासन नियमानुसार गुन्हे दाखल होणार त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी मुख्यमंत्री, मुख्य सचिव, उपमुख्यमंत्री व पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदनाद्वारे विचारणा केली आहे.

हरित महाराष्ट्र अभियान अंतर्गत हरित बीड ही संकल्पना घेऊन एकाच दिवशी ३० लाख वृक्ष लागवड करण्याचा संकल्प बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांनी जाहीर केला आहे. बीडचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते या वृक्ष लागवडीचा शुभारंभ परवा दि.०७ वार गुरूवार रोजी करण्यात ▶▶ उर्वरित पान २ वर




# एसटी महामंडळात जम्बो भरती
## दहावी पास ते पदवीधरांना नोकरीची संधी



तुम्ही नोकरीच्या शोधात असाल तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. राज्य सरकार वर कर्जाचा डोंगर वाढल्याने सध्या विविध विभागातील पदभरती बंद असताना एसटी महामंडळात मात्र नवीन पदभरतीची जाहिरात आलेली आहे. त्यामुळे तुम्ही स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही आनंदाची बातमी आहे. या माध्यमातून तुम्ही नोकरीची संधी मिळवू शकता. यासाठी खाली सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात नोकरी करण्यासाठी इच्छुक असलेल्या । उम ेदवारांसाठी सुवर्णसंधी आहे. नुकतेच महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने विविध प्रशिक्षणार्थी पदांसाठी नोकरीची जाहिरात प्रसिद्ध केली आहे. ही भरती नाशिक विभागीय

कार्यालयामार्फत जाहीर करण्यात आली. या भरतीसाठी ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने अर्ज करता येतील. या भरतीसंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी उमेदवारांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या अधिकृत वेबसाइटला भेट द्यावी.

या भरती अंतर्गत एकूण ३६७ रिक्त जागा भरल्या जाणार आहेत, ज्यात अभियांत्रिकी पदवीधर, इलेक्ट्रॉनिक्स मॅकेनिक, मॅकेनिक (रेफ्रीजरेशन अँड एअर कंडिशनिंग), मॅकेनिक मोटार व्हेईकल, शिटमेटल वर्कर, वेल्डर (गॅस अँड इलेक्ट्रीक), पेन्टर, मॅकेनिक डिझेल, इलेक्ट्रिशियन, फिटर, टर्नर आणि कारपेंटर यांचा समावेश आहे. या पदांसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत ११ ऑगस्ट २०२५ आहे. इच्छुक उमेदवारांचे वय १४ ते ३० वर्षांच्या दरम्यान असणे आवश्यक आहे.

सर्वप्रथम इच्छुक उमेदवारांनी http://www.apprenticeshipindia.gov.in या अधिकृत वेबसाइटवर जाऊन नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यानंतर पुढीलप्रमाणे अर्ज प्रक्रिया पूर्ण करायची आहे. प्रशिक्षणार्थी उमेदवारांच्या निवडीसाठी अर्जाचा नमुना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या नाशिक विभागीय कार्यालयात (एन. डी. पटेल रोड, शिंगाडा तलाव, नाशिक) येथे उपलब्ध आहे. हा अर्ज नमुना भरून कार्यालयात सादर करायचा आहे.

एमपीएससीकडून २८२ पदांसाठी जाहिरात

महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) महाराष्ट्र गट ब अराजपत्रित सेवा संयुक्त पूर्वपरीक्षेची जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. या अंतर्गत २८२ पदांसाठी पदभरती प्रक्रिया राबवली जाणार असून, ९ नोव्हेंबर रोजी राज्यभरातील ३७ जिल्हा केंद्रांवर परीक्षा घेतली जाणार आहे. एमपीएससीने याबाबतची माहिती दिली. गट ब अराजपत्रित सेवेअंतर्गत राज्य कर निरीक्षक या पदाच्या २७९, तर सहायक कक्ष अधिकारी पदाच्या ३ जागा भरण्यात येणार आहे. या पदभरतीसाठी उमेदवारांना १ ते २१ ऑगस्ट या कालावधीत ऑनलाइन अर्ज करून शुल्क भरता येणार आहे. तसेच, चलनाद्वारे शुल्क भरण्यासाठीची मुदत २५ ऑगस्ट आहे. संयुक्त पूर्वपरीक्षेतून मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी मुख्य परीक्षेची तारीख स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार असल्याचे 'एमपीएससी' ने नमूद केले आहे.

# महाराष्ट्रात सरकारी नोकरी आणि १.३२ लाख पगार, कुठे पाठवाल अर्ज ? जाणून घ्या!




चांगल्या पगाराची सरकारी नोकरी शोधत असाल तर तुमच्यासाठी आनंदाची बातमी आहे. महाराष्ट्र लोकसेवा आयोग म्हणजेच MPSC ने नोकर भरती जाहीर केलीय. अधिकृत वेबसाइटवर यासंदर्भात नोटिफिकेशन जाहीर करण्यात आले असून पदासाठी लागणारी शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, पगार, अर्जाची शेवटची तारीख याचा सविस्तर तपशील देण्यात आलाय.

एमपीएससीकडून ड्रग इन्स्पेक्टर पदांसाठी नवीन भरती जाहीर केलीय. ही भर्ती महाराष्ट्र शासनाच्या उच्च आणि तंत्रशिक्षण विभाग तसेच औषधि शिक्षण विभाग, मुंबई कार्यालयांसाठी आहे. या भर्ती अंतर्गत इच्छुक आणि पात्र उमेदवारांसाठी अर्ज प्रक्रिया 1 ऑगस्ट 2025 पासून सुरू झालीय.

किती शिक्षण आवश्यक?

ड्रग इन्स्पेक्टर पदासाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांकडे फार्मसी किंवा फार्मास्युटिकल सायन्समध्ये पदवी किंवा क्लिनिकल फार्माकोलॉजी किंवा मायक्रोबायोलॉजीमध्ये विशेषज्ञता असलेली पदवी असणे आवश्यक आहे. उमेदवाराने 21 ऑगस्ट 2025 पर्यंत संबंधित शैक्षणिक पात्रता पूर्ण केलेली असावी.

किती मिळेल पगार?

ड्रग इन्स्पेक्टर पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांना 41,800 ते 1,32,300 रुपये मासिक वेतन मिळेल. वेतनाव्यतिरिक्त, शासकीय नियमानुसार इतर भत्ते आणि गणवेश (वर्दी) प्रदान केला जाईल.

निवड प्रक्रिया कशी असेल?

ड्रग इन्स्पेक्टर पदासाठी उमेदवारांची निवड खालील टप्प्यांद्वारे केली जाईलःउमेदवारांना प्रथम लेखी परीक्षा द्यावी लागेल. लेखी परीक्षेतील कामगिरीच्या आधारे गुणवत्ता यादी तयार केली जाईल. निवडलेल्या उमेदवारांची कागदपत्रे तपासली जातील.

किती भरावे लागेल अर्ज शुल्क?

सामान्य वर्गातील उमेदवाराकडून 394 रुपये, आरक्षित वर्ग/महिला उमेदवाराकडून 294 रुपये अर्ज शुल्क घेतला जाईल. उमेदवारांना हे शुल्क ऑनलाइन पद्धतीने भरावे लागेल.

अर्ज कसा करावा?

उमेदवार खालील स्टेप-बाय-स्टेप प्रक्रियेचा अवलंब करून अर्ज करू शकतातःसर्वप्रथम, MPSC च्या अधिकृत वेबसाइट mpsc.gov.in ला भेट द्या वेबसाइटवरील Latest Updates विभागात जा आणि ड्रग इन्स्पेक्टर भर्तीशी संबंधित लिंक शोधा. भर्तीच्या सर्व तपशीलांची नीट तपासणी करा. New User Registration लिंकवर क्लिक करून नोंदणी करा आणि आवश्यक माहिती भरा. नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड वापरून वेबसाइटवर लॉग इन करा. वैयक्तिक माहिती, शैक्षणिक पात्रता आणि इतर आवश्यक तपशील भरा. अर्ज शुल्क ऑनलाइन पद्धतीने जमा करा.अर्ज पूर्ण झाल्यानंतर, अर्जाचा अंतिम प्रिंटआउट घेऊन तो भविष्यातील संदर्भासाठी जपून ठेवा.

अर्ज करण्याची शेवटची तारीख?

अर्ज करण्याची अंतिम तारीख 21 ऑगस्ट 2025 आहे. उमेदवारांनी MPSC च्या अधिकृत वेबसाइट mpsc.gov.in वर जाऊन अर्ज करावे.

महत्वाच्या सूचना

उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वी अधिकृत अधिसूचना काळजीपूर्वक वाचावी. अर्जामध्ये कोणतीही चूक टाळण्यासाठी सर्व तपशील नीट तपासून घ्यावेत. भर्तीशी संबंधित कोणत्याही अतिरिक्त माहितीसाठी किंवा शंकांचे निरसन करण्यासाठी MPSC च्या अधिकृत वेबसाइटला भेट द्या.अधिक माहितीसाठी किंवा कोणत्याही तक्रारींसाठी, उमेदवार MPSC च्या अधिकृत वेबसाइट mpsc.gov.in वर संपर्क साधू शकतात.

◆ पान ९ वरून पुढे...

## तुकाराम मुंढेंची...

तुकाराम मुंडेंची आतापर्यंत झालेली बदली आणि खाती (२००५-२०२५ पर्यंत)

१. ऑगस्ट २००५ – प्रशिक्षणार्थी, उपजिल्हाधिकारी, सोलापूर
२. सप्टेंबर २००७ – उपजिल्हाधिकारी, देगलूर उपविभाग
३. जानेवारी २००८ – सीईओ, जिल्हा परिषद, नागपूर
४. मार्च २००९ – आयुक्त, आदिवासी विभाग
५. जुलै २००९ – सीईओ, वाशिम
६. जून २०१० – सीईओ, कल्याण
७. जून २०११ – जिल्हाधिकारी, जालना
८. सप्टेंबर २०१२ – सहा आयुक्त विक्रीकर, मुंबई
९. नोव्हेंबर २०१४ – जिल्हाधिकारी, सोलापूर
१०. मे २०१६ – आयुक्त, नवी मुंबई
११. मार्च २०१७ – मुख्य कार्यकारी अधिकारी, पीएमपीएल, पुणे
१२. फेब्रुवारी २०१८ – आयुक्त, नाशिक महापालिका
१३. नोव्हेंबर २०१८ – सहसचिव, नियोजन
१४. डिसेंबर २०१८ – प्रकल्प अधिकारी, एड्स नियंत्रण, मुंबई
१५. जानेवारी २०२० – आयुक्त, नागपूर महापालिका
१६. ऑगस्ट २०२० – सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१७. जानेवारी २०२१ – राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, भारत
१८. सप्टेंबर २०२२ – आयुक्त, आरोग्य सेवा आणि संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान (छक्त्)
१९. नोव्हेंबर २०२२ – अचानक बदली, प्रतीक्षेत ठेवण्यात आले (छक्त् चा कार्यकाल फक्त २ महिने)
२०. एप्रिल २०२३ – सचिव, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास विभाग
२१. जून २, २०२३ – सचिव, मराठी भाषा विभाग
२२. जुलै २०२३ – कृषी आणि पशुसंवर्धन विभाग सचिव म्हणून बदली पुढे चालू राहिली.
२३. ऑगस्ट २०२५ – ५ ऑगस्ट २०२५ रोजी मुंडें यांची २३ व्यांदा

◆ पान ९ वरून पुढे...

बदली करण्यात आली असून त्यांना आता दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव म्हणून नियुक्त करण्यात आले आहेत.

## धनंजय मुंडे...

अधिकारी यांना केल्या. त्याचबरोबर या कामासाठी निधीची अडचण भासू देणार नाही, असेही त्यांनी आश्वस्त केले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, सुरेश अण्णा टाक, राजेंद्र सोनी, नितीन मामा कुलकर्णी, जालिंदर नाईकवाडे, शंकर कापसे, आर्किटेक्ट श्री बांगड, नगर अभियंता श्री बेंडले, जाफर खान, श्री ढवळे यांसह अधिकारी – पदाधिकारी आदी उपस्थित होते.

## शहरातील धानोरा...

बांधकाम विभागाची बैठक घेऊन धानोरा रोड आणि अंकुश नगर रोडची तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले.

शहरातील धानोरा रोड आणि अंकुश नगर या मोठी रहदारी असलेल्या रस्त्यांची मोठी दुरावस्था झालेली आहे. सदरील रस्त्यांचा प्रश्न हा या भागातील नागरिकांसाठी अत्यंत जिव्हाळ्याचा झालेला आहे. या रस्त्यांवर ठिकठिकाणी मोठ-मोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात तर पूर्ण रस्ता चिखलमय होऊन रहदारीस मोठी अडचण होत आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांनी एकत्र येऊन दि.२९ जुलै रोजी आंदोलन केले होते. या आंदोलनास आ.संदीप क्षीरसागर यांनी भेट देऊन नागरिकांशी चर्चा करत आंदोलन मागे घेण्याची विनंती केली होती. तसेच येत्या काही दिवसांतच या रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागेल, त्यासाठी मी स्वतः पाठपुरावा करेल, असे आश्वासन दिले होते. आ.क्षीरसागर यांच्या आश्वासनानंतर नागरिकांनी हे आंदोलन मागे घेतले होते. त्यानंतर आ.संदीप क्षीरसागर यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाची, सोमवार (दि.७) रोजी बीड शहरातील शासकीय विश्रामगृह येथे बैठक घेऊन या दोन्ही रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश दिले. पुढील काही दिवसातच धानोरा रोड आणि अंकुश नगर रोडच्या दुरुस्तीचे काम प्रत्यक्षात सुरु होणार आहे. दरम्यान या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आणि

◆ पान ९ वरून पुढे...

धानोरा रोड आणि अंकुश नगर भागातील नागरिक उपस्थित होते

## शिवसेना नेत्याच्या...

मराठवाडा सचिव अशोकजी पटवर्धन साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे साहेब, महिला आघाडी संपर्क प्रमुख संगीताताई चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये बीड जिल्हा शिवसेना पदाधिकारी यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीला शिवसेना युवासेना महिला आघाडी यांचे जिल्हाप्रमुख, जिल्हा संघटक, उपजिल्हाप्रमुख, तालुकाप्रमुख, तालुका संघटक, विधानसभा प्रमुख, विधानसभा संघटक, विधानसभा समन्वयक, शहर प्रमुख, शहर संघटक, शहर समन्वयक यांनीच फक्त बैठकीला उपस्थित राहावे अशा वरिष्ठांकडून सूचना आहेत. या आडवा बैठकीत जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगर पालिका निवडणुकांबाबत विचार विनिमय, ध्येय धोरण ठरविण्यात येणार असल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर यांनी कळवले आहे बीड जिल्ह्यासह धाराशिव, परभणी जिल्ह्यातील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांन ची पण बैठक याच ठिकाणी होणार असल्याचे सांगितले आहे.

## मोटारसायकल चोरी...

चोरीस गेली होती. याप्रकरणी डीबी पथकाने तत्परता दाखवत, गाडी चोरी गेलेल्या ठिकाणीच सापळा रचला. दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी दोनच्या सुमारास, संशयित चोर पुन्हा त्या भागात चोरीसाठी येताच पोलिसांनी त्याला रंगेहात अटक केली. चौकशीत त्याने डॉ. तुपे यांची गाडी चोरी केल्याची कबुली दिली. संबंधित गाडी हॉटेल स्वराज समोर आढळून आली असून, पोलिसांनी ती जप्त केली आहे. दरम्यान, दुसऱ्या घटनेत, वैभव संजय वराट (रा. आयटीआय कॉलनी, बीड) या अभिलेखावरील गुन्हेगाराने दिनांक २ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजता बंजारा हॉटेल समोर भैय्यासाहेब नागनाथ सोनकांबळे (रा. सम्राट चौक, बीड) यांच्याकडून जबरदस्तीने मोबाईल व १२०० रुपये लंपास केले होते. बीड डीबी पथकाने या प्रकरणातही जलद कारवाई करत मुख्य आरोपी वैभव वराट याला अटक केली असून, त्याच्याकडून लुटलेले रुपयेही जप्त करण्यात आले आहेत.

◆ पान ९ वरून पुढे...

त्याच्यावर दोन दिवसांची पीसीआर मागण्यात आली आहे. या प्रकरणातील दुसरा आरोपी अद्याप फरार असून, त्याचा शोध सुरु आहे. या यशस्वी कारवाईमध्ये पोलीस अधीक्षक नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांचे मार्गदर्शन लाभले. पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ, पोनि. बाबा राठोड, तसेच अंमलदार संजय राठोड, शहेंशा सय्यद, संदीप आघाव, अमर घुगे, गहिनीनाथ बावनकर, राम पवार, सुशील उगले यांनी ही कारवाई केली. या घटनांमुळे नागरिकांमध्ये पोलिसांबद्दल विश्वास निर्माण झाला असून, दोन्ही कारवायांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## अजितदादा तुती...

येणार आहे.आणि एकाच दिवशी ३० लाख झाडे लावत देश पातळीवरचा विक्रम नोंदविण्याचा मनोदय जिल्हाधिकाऱ्यांनी बोलून दाखवला आहे .आणि हे ३० लाखांचे उद्दिष्ट गाठण्यासाठी तब्बल ७ लाख तसेच वृक्ष लावले जाणार आहेत. या विक्रमाची नोंद इंडियन बुक ऑफ रेकॉर्डस मध्ये व्हावी यासाठी प्रयत्न करण्याचा मनोदय व्यक्त करत मागच्या दोन महिन्यांपासून बीडचे जिल्हा प्रशासन काम करत असल्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉनसन यांनी पत्रकार परिषद सांगितले. या मोहिमेची सुरुवात राज्याचे उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार असून अजित पवार बीडच्या खंडेश्वरी मंदिर परिसरातील मैदानात वृक्ष लागवड करणार आहेत .विशेष म्हणजे एकाच दिवशी ३० लाख वृक्ष लागवडीचे अवघड आव्हान पेलण्यासाठी नरेगाच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या तुती लागवड (रेशीम विकास) योजनेतून एकाच दिवशी जिल्ह्यात तुतीचे तब्बल ०७ लाख वृक्ष लावण्याचा विचार जिल्हा प्रशासन राबविणार असल्याची माहिती देखील जिल्हाधिकारी दिली. त्यामुळे तुती लागवड ही वृक्ष लागवड सदरात मोडते का?? तसेच तुती वृक्षलागवड केलेल्या शेतक-यांना ३ वर्षांनंतर तुती लागवड केलेल्या झाडांची कापणी,तोडणी करण्यासाठी शासनाकडून परवानगी घेणे बंधनकारक आहे का. तसेच तुती वृक्ष म्हणून गणना केली तर तोडल्यास शासकीय नियम ानुसार गुन्हे दाखल होणार का??याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात यावे. जिल्हाधिकारी यांच्या मार्फत सुचना देण्यात याव्यात. अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

## बाबांवर असलेल्या...

गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या चरणी असावी गुरू नवनाथ बाबा यांनी आपली निष्ठा गुरू किसनबाबा यांच्या प्रति समर्पित केली हिच निष्ठा गुरू किसनबाबा महाराज यांनी गुरू साधू बाबा महाराज यांच्या प्रति समर्पित केली म्हणून आज गोरक्षनाथ टेकडीच वैभव जे दिसत आहे ते फक्त गुरू किसन बाबा महाराज व गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या प्रति तुम्हा भाविक भक्तांच्या निष्ठा आहे, म्हणून आज हे वैभव गुरू निष्ठेचा प्रसाद आहे, असे संत निळोबा महाराज यांच्या अभंगाचे विवेचन करताना संत निळोबा महाराज यांना पांडुरंग उठता, बसता, जेवताना, झोपताना सर्वत्र पांडुरंग दिसत आहे. त्याचे सर्व मनोरथ पादुरंग पूर्ण करत आहेत तस तुमची निष्ठा गुरू नवनाथ बाबा महाराज व गुरू किसन बाबा महाराज यांच्या प्रति राहू द्या तुमचे सर्व मनोरथ पादुरंग पूर्ण करेल, असे प्रतिपादन शंकर महाराज शेवाळे यांनी कीर्तनात केले त्यांना मृदुंगवादन साथ अरुण महाराज कदम व बाजीराव महाराज काळे यांनी दिली. या कीर्तनात कीर्तनसाथ बाळासाहेब महाराज मोरे व उत्तरेश्वर महाराज पुरभे यांनी दिली सोमवारी प्रवचन सेवा अच्युत महाराज रेडे यांनी केले. अभंगवाणी टेकडी गायक वादक मंडळी यांनी केले. तसेच सोमवारी रात्री हरिजागर करण्यात आला . कीर्तन प्रवचन अभंगवाणी हरी जागर याला भाविक भक्तांची अलोट गर्दी होत आहे. हरिपाठ, गाथा पूजन, प्रवचन, कीर्तन, अभंगवाणी, हरी जागर अशा हरी नामाने अवघी गोरक्षनाथ टेकडी दुमदुमली आहे.

## श्री क्षेत्र गोरक्षनाथ...

संस्थान येथे आरोग्य सेवेत दिली आहे. काल दिनांक ५ ऑगस्ट रोजी पहिल्याच दिवशी २१५ भाविक भक्तांनी विविध आजारांसाठी येथील आरोग्य सेवेचा लाभ घेतला.

यावेळी नाळवंडी प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी काकडे , काटकर, जाधव, आरोग्य प्रशिक्षणार्थी अक्षय गाडीवान यांनी

◆ पान ४ वरून पुढे...

भाविक भक्तांना सेवा दिली.. यावेळी संचालक धनंजय गुंदेकर यांच्यासह मानकुरवाडी सरपंच ज्ञानेश्वर जोगदंड, मौजवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते दादा जाधव, राधेश्याम फड, भीमा शेलार, उत्तरेश्वर जाधव, बाळासाहेब कदम, आबासाहेब ढवळे, गहिनीनाथ महाराज, ढेंगे पाटील, लहू जाधव आदी उपस्थित होते..

## अडचणीत सापडलेल्या...

विभागाकडे निवेदन सादर केले आहे. जनावरांची योग्य देखभाल करता यावी म्हणून गौशाळा व पांजरापोल संस्थांना १५० रुपये प्रति पशु प्रतिदिन अनुदान मंजूर करावे, अशी या निवेदनात मागणी करण्यात आली आहे. ही योजना केवळ देशी गायीपुरती मर्यादित न ठेवता बैल, म्हैस, बकरी यांसारख्या सर्व जनावरांवर लागू करावी, अशीही विनंती करण्यात आली आहे. जनावरांची संख्या वाढत असताना चारा व औषधोपचार यांसाठी लागणारा खर्च भागवणे अशा संस्थांना शक्य होत नाही. त्यामुळे शासनाने तातडीने निधी वितरित करून शेतकरी व गोरक्षण संस्थांना दिलासा द्यावा, असे आमदार मुंदडा यांनी म्हटले आहे. यासोबतच गौशाळांनी परिसरातील शेतकऱ्यांना मोफत गोबर देऊन नैसर्गिक शेतीला चालना द्यावी, अशी सूचना त्यांनी केली आहे. यामुळे जैविक शेतीला बळ मिळून रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी होईल, असे आमदार मुंदडा यांनी निवेदनात स्पष्ट केले आहे. सध्याची परिस्थिती गंभीर असून शासनाने त्वरीत उपाययोजना करावी, अशी आग्रही मागणी आमदार नमिता मुंदडा यांनी या पत्राद्वारे केली आहे.

## अतिक्रमण धारकास...

२२५ अतिक्रमण धारकास पि.टी.आर वाटप करण्यात आला होता व शासकीय जागेवरील आरक्षण उठवण्यासाठी त्यांनी प्रस्ताव पाठवाला होता त्या डि.पी. प्लॅनला २०२४ ला मंजुरी मिळाल्यानंतर संजयनगर येथील काही आरक्षण उठवण्यात आले होते म्हणून गेवराई नगरपालिकेचे मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी एप्रिल महिन्यात एक जाहीर प्रगटण

◆ पान ४ वरून पुढे...

काढुन अतिक्रमण धारकास पि.टी.आर साठी अर्ज दाखल करण्यास सांगितले होते त्या अनुषंगाने संजयनगर येथील काही अतिक्रमण धारकास पि.टी.आर.ची प्रकिया सुरु आहे त्या संदर्भात माहीती घेऊन अतिक्रमण धारकास पि.टी.आर वाटपात भेदभाव करु नका अशा सुचना बाळराजे पवार यांनी मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांना केली आहे

यावेळी माहीती देतांना मुख्याधिकारी म्हणाले की शासन निर्णयानुसार २०१८ पासून पंतप्रधान आवास योजनेंतर्गत घरकुलासाठी अतिक्रमण धारकास पि.टी.आर वाटप करण्याची प्रक्रिया सुरु असून संजयनगर मधील अतिक्रमण धारकास टप्प्या टप्प्याने आदेश होऊन शासकीय जागेवरील निवासी अतिक्रमण धारकास सरसकट पि.टी.आर वाटप करण्यात येणार आसल्याचे मुख्यांधिकारी विक्रम मांडुरके यांनी माहीती दिली आहे आज दि.,५ रोजी बाळराजे पवारांच्या उपस्थितीत नगरपालिकेत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती यावेळेस मा.नगराध्यक्ष सुशील जंवजाळ, यांच्या सह सर्व मा.नगरसेवक,पदाधिकारी व अतिक्रमण धारक उपस्थित होते

## अधिका-यांच्या हेकेखोरपणामुळे...

उदासिन झाला असुन वर्षे २०२१ - २०२२ चे कुशल देयक आम्हा शेतक-यांना तात्काळ द्यावे अन्यथा तिव्र आंदोलन करण्याचा इशारा भाजपाचे जेष्ठ नेते अरूणराव राउत यांनी दिला आहे.

माजलगाव तालुक्यामध्ये मागील अनेक वर्षांपासुन रेशीम शेतीकडे शेतकरी मोठ्या प्रमाणात वळला होता. तालुक्यातील अनेक शेतक-यांनी सहज आणि सोप्या पध्दतीने कष्टाने व मेहनतीने रेशीम शेती करण्याचा संकल्प केला होता. केंद्रीय शेती धोरणाप्रमाणे हेक्टरी चार लाख ३८ हजार अनुदान शेतक-यांना मिळत होते. मिळणारे उत्पन्न व अनुदान यामुळे शेतकरी ब-यापैकी परवडणारी रेशीम शेती करत होता. परंतु जिल्हाधिकारी बीड यांना वारंवार निवेदने, सुचना देउनही बीड जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील शेतक-यांना वेळेवर अनुदान मिळाले मात्र माजलगाव तालुक्यातील ३० ते ३५ शेतक-यांना वर्षे २०२१ - २०२२ या दोन वर्षांचे

◆ पान ४ वरून पुढे...

अनुदान न मिळाल्याने शेतकरी आंदोलनाच्या पावित्र्यात आला आहे. बीडचे जिल्हाधिकारी यांना भेटुनही हे बिले का निघत नाहीत ? तर रेशीम शेतीचे आयुक्त यांनीही फोन करून सांगुनही उपजिल्हाधिकारी श्री. मुळे हे बीले का काढत नाही ? हा शेतक-यांना पडलेला प्रश्न आहे. माजलगाव तालुक्यातील शेतकरी शिवराज फाटे, पांडुरंग बडे, विनोद तोंडे, माणिक डाके, सचिन लगड, कोंडाबाई सपकाळ, विष्णु साठे, विष्णु शिंपले यासह दत्तात्रय डाके हे अनुदान रखडलेल्या शेतक-यांचे अनुदान जिल्हाधिकारी बीड यांनी तात्काळ खात्यात जमा करावे व रेशीम शेती उद्योग वाचवावा आणि शेतक-यांना रेशीम शेतीसाठी प्रोत्साहीत करावे अन्यथा शेतक-यांसोबत घेत आपण तिव्र आंदोलन करण्याचा इशारा भाजपा नेते अरूण राउत यांनी दिला आहे.

## शेतकऱ्यांच्या सेवेत...

ग्रामस्थांच्या वतीने त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला .

कार्यक्रमाचे आयोजन व उपस्थिती : या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महसूल मंडळातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली . यामध्ये ग्राम महसूल अधिकारी विजय बहिर , यशवंत सानप , उत्तरेश्वर खांडे , ज्योती आडागळे , स्वाती घुगे यांचे विशेष योगदान होते .

या कार्यक्रमास परिसरातील शेतकरी , ग्रामस्थ , महिला , विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते . साक्षाळपिंपरीचे ग्रामविकास अधिकारी , सरपंच , उपसरपंच सौरभ नलावडे , अंकुश काशीद , परशुराम काशीद , शंकर काशीद , शहादेव सदाफुले , आदिनाथ क्षीरसागर , सुनिल काशीद , ज्ञानेश्वर काशीद , दत्तात्रय काशीद , सविता पवार , केतुरा चे सरपंच मयूर तळेकर , पारगाव शिरस चे सरपंच दिनकर जमदाडे , रामकिसन वाटमोडे , उमरद जहागीरचे सरपंच दादासाहेब शेळके , तसेच सौंदाना येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे राजू गायके यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली . हा उपक्रम म्हणजे महसूल विभागाची गावकऱ्यांप्रती असलेली कळकळ आणि सेवा-भावना यांचे जिवंत उदाहरण आहे .

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# रस्त्याच्या मधोमध असणारे रोहित्र म्हणजे विद्युत बॉम्बच

## महावितरण आणि नगरपरीषद यांची टोलवाटोलवी तर लोकप्रतिनिधींच्या डोळ्यावर झापडं ; जीव गेल्यावरच प्रशासनाला जाग येणार का? : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील चौकाचौकात आणि रस्त्याच्या कडेला असणारी रोहित्रे हि एखाद्या विद्युत बॉम्ब प्रमाणेच उभी असुन कधी या रोहित्राचा स्फोट होईल सांगता येत नाही. धोकादायक रोहीत्रे किमान १० अथवा त्यापेक्षा जास्त उंचीवर असणे बंधनकारक असताना ३ते ४ फुट उंचीवर असणा-या रोहित्रांमुळे बीडकरांचा जीव धोक्यात आहे. रोहित्राचा स्फोट होऊन त्यातुन उडालेल्या तेलामुळे रस्त्याने जाणारी मुले भाजल्याच्या घटना घडलेल्या आहेत.महावितरणच्या रस्त्याच्या मधोमध असणा-या धोकादायक डिपी हटविण्यात यावी अशी नागरीकांनी नगर परिषद आणि महावितरणला वारंवार मागणी करूनही प्रशासनाला याचे गांभीर्य नसल्याचे दिसून येते. नगरपरीषद महावितरणकडे तर महावितरण नगरपरीषदेकडे बोट दाखवून जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करत आहे. लोकप्रतिनिधींनी डोळ्यावर झापड बांधल्याने त्यांना याचे गांभीर्य दिसून येत नसल्याने एकंदरीतच एखाद्याचा जीव गेल्यावरच लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केला आहे.

डीपीमध्ये आग लागल्याने स्फोट होऊन शाळकरी मुलांना गंभीर धोका होण्याची शक्यता पण प्रशासनाला गांभीर्य नाही : उत्तम राव मिसाळ नागरीक बीड

कॅनॉल रोड ते तुळजापूर मध्ये अनेक यशवंतराव विद्यालय, शिवाजी विद्यालय तसेच विविध खाजगी कोचिंग क्लासेस , वसतिगृह या परीसरात आहेत. लहान मुले, महिला, ज्येष्ठ नागरीकांची वर्दळ असणाऱ्या या परीसरात महावितरणची विद्युत डीपी रस्त्याच्या मधोमध आहे. रस्त्यावरून ये जा करणा-या शाळकरी मुलांना याचा धोका आहे. प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करूनही प्रशासन दुर्लक्ष करते असा आरोप येथील रहिवासी उत्तमराव मिसाळ यांनी केला आहे.





एखाद्याचा जीव गेल्यावरच लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला जाग येणार का ? : डॉ.गणेश ढवळे सामाजिक कार्यकर्ते

बीड शहरात गेल्या २ वर्षात अनेक ठिकाणी शासनाच्या नगरोत्थान सुवर्ण जयंती योजनेंतर्गत जवळपास १४० कोटी रुपयांच्या सिमेंट क्रांकीट रस्त्यांची व नालींची कामे करण्यात आली. मात्र रस्त्याच्या मध्यभागी व कडेला असलेली उघडी व जमिनीलगत असणारे रोहित्रे आणि पोल हटविण्यासाठी निधीची तरतूद नसल्याने वाहतुकीस अडथळा व अपघाताला निमंत्रण ठरणारी रोहित्र व विद्युतखांब काढण्याची तसदी संबंधित विभागाने घेतली नाही.काही ठिकाणी वीज रोहित्र ऐन वर्दळीच्या ठिकाणी आणि बाजारपेठेतच आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस असल्याने आर्थिंग मधुन करंट, उघड्या तारा ,फ्युजची उघडी पेटी धोक्याचे कारण ठरण्याची शक्यता आहे. सुचना फलक,रक्षक संरचना किंवा सुरक्षा नसल्याने गंभीर अपघाताची शक्यता आहे. यासंदर्भात तक्रारी,निवेदने आणि आंदोलनानंतरही प्रशासनाला जाग येत नसल्याने एखाद्याचा जीव गेल्यावरच लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाला जाग येणार का ? असा संतप्त सवाल डॉ.गणेश ढवळे यांनी केला आहे.

शहरातील धोकादायक रोहित्रे

शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह रोड, तुळजाई चौक, राजीव गांधी चौक, बार्शी नाका, केएसके महाविद्यालय परीसर, बालेपीर, माने काम्प्लेक्स रोड, सुभाष रोड, जालना रोड,जुने एसपी कार्यालय,कंकालेश्वर मंदिर, अण्णाभाऊ साठे चौक, अहिल्यादेवी होळकर पुतळा, बलभीम महाविद्यालय, पंचशील नगर, शाहुनगर, मोमीनपुरा आदी ठिकाणी उघडे रोहित्र आणि त्यात उघडे फ्युज बाक्स, वीज वाहिनी उपकरणे धोकादायक स्थितीत आहेत.

रस्ता रुंदीकरण करताना रोहित्रे व ईतर विद्युत उपकरणांचे स्थलांतर हे नगरपालिका व बांधकाम विभागाचे काम असल्याचे तर उघड्यावरील उपकरणांच्या दुरूस्तीचे काम हाती घेण्यात येईल असे प्रेमसिंग राजपुत्र अधिक्षक अभियंता महावितरण बीड परीमंडळ स्पष्टीकरण देतात. तर नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी आंदोलन अनुषंगाने सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांना दिलेल्या लेखी पत्रात शहरातील रस्त्यांच्या मध्यभागी असलेले रोहित्र व विद्युत पोल महावितरणच्या मालकीचे असल्यामुळे ईतरत्र सुरक्षित ठिकाणी हलवुन नगरपरिषदेला सहकार्य करावे अशा आशयाचे पत्र अधिक्षक अभियंता महावितरण यांना दिले आहे.एकंदरीतच महावितरण आणि नगरपरीषदेच्या भोंगळ कारभार नागरीकांच्या मुळावर आला आहे.

# समाजात देष पसरवणारे जातीयवादी गुंडांनो खबरदार

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

हज हाऊस येथे आयोजित राज्य मुस्लिम खाटीक सेवा संस्थेच्या जिल्हास्तरीय मेळाव्यात हाजी अरफात शेख यांनी खाटीक समाजाच्या हितासाठी लढण्याचा निर्धार व्यक्त करत उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. मी वोट मागायला नाही, तर समाजाच्या समस्या सोडवायला आलो आहे, असा खणखणीत इशारा देत त्यांनी समाजाला एकजुटीचे आवाहन केले. या व्यासपीठावर एमआयएम जिल्हाध्यक्ष शफीक शेख, जावेद कुरेशी आणि हाजी जे.डी. शहा यांची उपस्थिती होती.

१२ वर्षांचा लढा, आता ३६ जिल्ह्यांमध्ये मोहीम- गेल्या १२ वर्षांपासून मुंबईत सर्वपक्षीय



नेत्यांना एकत्र आणून खाटीक समाजाच्या समस्या मांडणाऱ्या हाजी अरफात यांनी यंदा राज्यातील ३६ जिल्ह्यांमध्ये फिरून प्रत्येक गावातील अडचणी जाणून घेण्याचा संकल्प सोडला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पाठबळाने मी समाजाच्या समस्या जाग्यावरच सोडवणार, असा ठाम विश्वास त्यांनी व्यक्त केला. विशेषत: खाटीक समाजाला एससी प्रवर्गातून आरक्षण मिळवून देण्यासाठी ते पूर्ण ताकदीने लढणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

माझा समाज जागेल, तेव्हा इन्कलाब येईल, असा जोरदार नारा देत हाजी अरफात यांनी समाजाला शिक्षणाच्या माध्यमातून प्रगतीच्या वाटेवर नेण्याचे स्वप्न उलगडले. मीरा रोडवरील एका मुलीने पायलट होऊन बोईंग उडवल्याचा दाखला देत ते म्हणाले, माझा समाज आता प्रगतीच्या मार्गावर आहे. ग्रामीण भागातील अडचणींवर भाष्य करताना त्यांनी लातूरमधील एका वृद्ध महिलेची आठवण सांगितली, जी त्यांना माझा राजा म्हणाली. तिच्या घरी गॅस नव्हता, चूल होती. अशा अडचणी मी सोडवणार, असे ठाम आश्वासन त्यांनी दिले. जातीयवादी हल्ल्यांविरुद्ध आक्रमक भूमिका घेत हाजी अरफात म्हणाले, जो कोणी माझ्या समाजाला त्रास देईल, त्याला हा हाजी अरफात सोडणार नाही! जावेद कुरेशी यांना पाठिंबा देत ते म्हणाले, जावेद भैय्या, तुम्ही पुढे जा, मी तुमच्या सोबत आहे! भाजपामधील आपल्या भूमिकेचा अभिमान व्यक्त करत त्यांनी समाजाच्या भविष्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. समाजाच्या एकजुटीचा संदेश- मी बाजारात येऊन समाजाच्या अडचणी जाग्यावरच सोडवणार, असे आश्वासन देत हाजी अरफात यांनी उपस्थितांचा उत्साह द्विगुणित केला. हा मेळावा खाटीक समाजाच्या एकजुटीचा आणि प्रगतीचा संदेश घेऊन संपन्न झाला.

# सरस्वती विद्यालयातील ६८० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप ; १२ वर्षांपासून उपक्रम

## विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी 'गुरू आनंद महिला प्रतिष्ठाण'चा मोलाचा हातभार

**बीड । प्रतिनिधी**

'गुरू आनंद महिला प्रतिष्ठाण, बीड' आणि 'प्रयास फाऊंडेशन, मुंबई' यांच्या संयुक्त विद्यमाने बीड शहरातील सरस्वती विद्यामंदिर, शिवाजीनगर या शाळेतील ६८० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. समाजातील गरजू व गोरगरीब विद्यार्थ्यांपर्यंत शैक्षणिक साधनांची मदत पोहोचावी, हा या उपक्रमाचा मूळ उद्देश असून गेल्या १२ वर्षांपासून अध्यक्षा सीमा ओस्तवाल हा उपक्रम सातत्याने राबवला आहे. या उपक्रमांतर्गत प्रत्येक विद्यार्थ्याला ४ रजिस्टर, एक पेन, एक पेन्सिल आणि पहिलीच्या



विद्यार्थ्यांना पाटी व पेन्सिल देण्यात आली. शिक्षणाची गोडी लागावी, साधनांची कमतरता जाणवू नये यासाठी हा उपक्रम वर्षानुवर्षे राबवण्यात येतो आहे. साहित्य वाटप समारंभ प्रसंगी गुरू आनंद महिला प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सीमा ओस्तवाल यांच्या उपस्थितीत हा उपक्रम उत्साही वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी नगरसेवक नृसिंह नाईकवाडे होते. यावेळी सरस्वती विद्यामंदीरचे संचालक ॲड. विश्वनाथ मगर, माजी नगरसेवक गणेश वाघमारे, उत्तमराव पवार, प्रतिक कांबळे, दत्तात्रय नरनाळे गणेश जाधव यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती होती. त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# गोरक्षनाथ प्राथमिक माध्यमिक विद्यालयात मोफत शैक्षणिक साहित्य वाटप

## शाळेच्या माध्यमातून आम्ही विविध क्षेत्रांमध्ये मुलांचे भविष्य घडवले : सोमनाथराव बडे

**बीड । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील ढेकनमोहा येथील गोरक्षनाथ प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये गुरु आनंद महिला प्रतिष्ठान बीड व प्रयास फाउंडेशन मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात इ. पहिली ते दहावीच्या मुलाना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप गुरु आनंद महिला प्रतिष्ठान व प्रयास फाउंडेशन मुंबई यांच्या वतीने ऊसतोड कामगार शेतकरी कष्टकरी यांच्या मुलांना एक मदतीचा हात म्हणून मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. गेल्या अनेक वर्षापासून सहकार्य करत आलेले हे प्रतिष्ठान आहे यावेळी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सौ. सीमा मनोज ओस्तवाल (अध्यक्ष



गुरु आनंद प्रतिष्ठान बीड ) समंदर खान ( गटशिक्षणाधिकारी प. स बीड ) माजी प्राचार्य तथा मकरध्वज शिक्षण संस्थेचे सचिव सोमनाथराव बडे सिद्धेश्वर माटे (ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी प. स. बीड ) नागेश शिंदे (माजी सरपंच ढेकणमोहा) अदनान खान ( कार्यकारी संपादक दैनिक किसान बीड ) बंडू गाडीवान ( सरपंच) अनिल वाघमारे ( संपादक डोंगरचा राजा) अंकुश गोरे (मु .अ सरस्वती विद्यालय बीड) साजिद अहमद सिद्दिकी ( केंद्रप्रमुख ) बालाप्रसाद जाजू (चेअरमन ) संतोष जाधव ( ग्रामपंचायत सदस्य )आदीं मान्यवरांची उपस्थिती होती यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मुंडे डी .एस. सर , घोळवे सर (उपमुख्याध्यापक) संजय बडे सर , बोराडे सर , जाधव सर सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी प्राध्यापक पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते .

# संस्कार भारती माजलगाव च्या वतीने ऋतू हिरवा कार्यक्रम उत्साहात संपन्न

**माजलगाव । प्रतिनिधी**

संस्कार भारती संयोजन समिती माजलगावच्या वतीने रविवार दि.३ ऑगस्ट २०२५ रोजी 'ऋतू हिरवा' या सुरेल संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात नटराज पूजन आणि संस्कार भारती च्या ध्येय गीताने करण्यात आली.

यावेळी आवर्जून उपस्थित संस्कार भारती देवगिरी प्रांत अध्यक्ष श्रीमती स्नेहल पाठक, प्रांत मंत्री प्रमोद वझे, जिल्हा सदस्य श्रीराम देशपांडे या सर्वांचे स्वागत करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांचे मनोगत झाले. नंतर मुख्य मैफिलीला सुरुवात झाली. यात श्रेया ठोंगे हिने राग मिया मल्हार ची बंदिश 'बरखा ऋतू झर लागी' गायली तसेच कुणाल कुलकर्णी यांनी 'गरज गरज आज मेघ ' ही



याच रागातील बंदिश गायली. चैतन्य जाधव यांनी संसाराचा धंदा हे भक्तीगीत सादर केले. श्रेया ठोंगे हिने ऋतू हिरवा, केतकीच्या बनी तिथे, गा गीत तू सतारी असे बहारदार गाणे गायले. कुणाल कुलकर्णी यांनी मर्म बंधातली ठेव ही, शब्दावाचून कळले सारे, बाजे मुरलिया या गीतांचे सादरीकरण केले. तसेच रानकवी ना.धो.महानोर यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त त्यांना आदरांजली म्हणून त्यांनी लिहिलेले 'चिंब पावसानं रान झालं' हे गीत कुणाल आणि श्रेया यांनी गायले. या गीताला रसिक श्रोत्यांची भरभरून दाद मिळाली. तसेच शेवटी संगीत संयोजक संजय कुलकर्णी यांनी गावती रागातील एक भावगीत सादर केले. या कार्यक्रमासाठी गणेश विभुते, सुबोध देशपांडे, प्रवीण तिवारी यांनी अतिशय सुरेल अशी साथ संगत केली. तसेच कार्यक्रमासाठी प्रद्युम्न नवशिंदे ,कुणाल दुगड, मृदुला नवशिंदे, तसेच जोगडे काका, मंजुषा देशपांडे, संपदा विटेकर, शारदा ठोंगे, रत्नपारखी काका, या रसिक श्रोत्यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता संस्कार भारती संयोजन समिती माजलगाव च्या सर्वच सदस्यांनी परिश्रम घेतले. अश्या प्रकारे संस्कार भारती माजलगाव चा ऋतू हिरवा हा कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने झाली.

**दैनिक मराठवाडा पत्र** दि. ०५/०८/२०२५

**टी.सी. हरवला आहे.**

ज्योती परमेश्वर राजवन या नावाचा या इयत्ता दहावी पास चा टी सी बीड आहेर वडगाव प्रवासा दरम्यान हरवला आहे. सापडल्यास संपर्क : ९८८१५ ७११८८

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्स, कमवा व शिका योजना आणि रासेयो स्वयंसेवकांचा धारूर न्यायालय परिसर वृक्षारोपणात उत्स्फूर्त सहभाग



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथे आयोजित चला एक दिवस पर्यावरण रक्षणासाठी देऊया आणि एक झाड लावूया या उपक्रमांतर्गत धारूर न्यायालय परिसरामध्ये वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमामध्ये राजमाता जिजाऊ महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्स, कमवा व शिका योजनेचे विद्यार्थी आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उस्फूर्तपणे सहभागी झाले. तसेच धारूर शहरातील रयत मित्र संघटना, पर्यावरण समृद्धी मंच, पा. बा. सावंत प्रतिष्ठान, सृष्टी व संवर्धन संघटना, डॉक्टर महिलांचे झाडांची भिशी, बीड, धारूर शहरातील संस्था यांनी यामध्ये सहभाग घेतला. याप्रसंगी धारूर न्यायालयाचे न्यायाधीश मा. वाली साहेब, न्यायालयातील सर्व कर्मचारी, धारूर पोलीस स्टेशनचे पीआय श्री. वाघमोडे साहेब, पोलीस स्टेशनचे कर्मचारी, राजमाता जिजाऊ महाविद्यालयाचे उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, कमवा व शिका योजनेचे समन्वयक प्रा. नागोराव वाघमारे, कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. बी. जाधव, डॉ. विजयकुमार कुंभारे, प्रा. बालासाहेब जोगदंड यांनी सहभागी एनसीसी कॅडेट्स व रासेयो स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. या उपक्रमात सहभागी विद्यार्थ्यांचे प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी अभिनंदन केले.

## चौकशीची जाहीर नोटीस

एस. आर. एन. क्रमांक: BED/02680/18/25

फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक: 1037/25

सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक भोनाई देवीचे देऊळ वडगांव (क) ता.बीड जि. बीड बाबत

न्यासाचा पत्ता :- अट वडगाव का पोस्ट कलसांबार टीक्यू बीड डिस्ट्रिक्ट बीड, बीड, बीड, वडगाव (कळसांबर)

**अर्जदार:-गणेश आसाराम मोरे,**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त, बीड, हे वर नमूद केलेला अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्द्यांवर चौकशी करणार आहेत:-

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?

**जंगम मिळकत (वर्णन)**

| अ.क्र. | तपशील | अंदाजे मूल्य |
|---|---|---|
| 1 | Tone 1 | 2000.00 |
| 2 | Statue of Stone | 0.00 |

**स्थावर मिळकत (वर्णन)**

| अ. क्र. | शहर किंवा गांव | सी.एस किंवा महानगरपालिका किंवा सर्वेक्षण क्र. | क्षेत्र | मूल्यांकन | मुदत / कालावधी किंवा स्वरूप | अंदाजे मूल्य |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Wadgaon (Kalsambar) | Khate No. 10045/ Gat No.277 | 5476 | 150000 | 12x12 RCC Deul Contraction And 15x20 Sambhamandap | 150000.00 |

**(ब) स्थावर मिळकत:- रोख रु. १५००००/- मात्र**

(अक्षरी रुपये एक लाख पन्नास हजार मात्र फक्त)

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिद्ध झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतींचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व या कार्यालयाचे शिक्यानिशी आज दिनांक ३०-०७-२०२५ रोजी दिली .

शिक्का

**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय बीड**

M.V.C. No. 736/2024

**IN THE COURT OF THE IX[th] ADDL. DIST. JUDGE AND ADDL. M.A.C.T.. BELAGAVI, AT: BELAGAVI**

BETWEEN:
1. Smt: Sharadabai K. Rajput... PETITIONER
AND:
1. Reliance General Insurance Co.Ltd. And others.... RESPONDENTS
CITATION
To,
**The Respondent No.1**
Shri: Ashruba S/o. Ravasaheb Thombare
Age: Major, Occ: Agriculture,
R/o. A/P: Dahipal Wadmauli, Tal: Kaij, Dist: Beed, State: Maharashtra - 431123
(Owner of Tractor No. MH-23/AS-9534)
**The Respondent No.3**
Shri: Navnath S/o. Raosaheb Thombare
Age: 34 years, Occ: Driver,
R/o. Dahipal Wadmuli, Tal: Kaij, Dist: Beed, State: Maharashtra - 431123
(Driver of Tractor No. MH-23/AS-9534)

Whereas, the above named petitioner has filed the petition on death of "Shri: Aravind S/o. Kasu @ Kashinath Rajput" was proceeding by riding the Motor Cycle No. MH-09/DE-7695 by wearing helmet, in a moderate speed, with due care and caution on his correct side of the road, when he came on the spot of the accident i.e. on Kundal to Dudhondi Road, in Kundal village, at that time, driver was driving the Tractor No. MH-23/AS-9534 in a very high speed all of sudden dashed to the Motor cycle and to the deceased from opposite side and thereby caused the accident on 05-01-2024 at about 7:30 p.m. and thereafter the deceased was died in the said accident and thereafter deceased legal heir has filed the claim petition against tractor owner, its insurer and its driver by claiming the compensation an amount of Rs.80,00,000/-, this court has issued notice by R.P.A.D. to the Respondents No.1 & 3's addresses as per R.C., and driving license address respectively, but the said R.P.A.D. envelopes are returned as addressee "Not Found".

Therefore, take the notice that, the top numbered petition has been posted on 04-09-2025 for your appearance and to file an objection to the petition if any, TAKE NOTICE that, in case of your failure to appear on the said date aforesaid at 11.00 a.m. the case will be heard and proceeded by placing you ex-partie.

Given under my hand and the seal of this office on this 04 day of August 2025.

**sd/-**
**Bench Shirastedar**

**By order of Court**

**sd/-**
**(M.V. Angadi)**
**Advocate for Petitioners**

**Sd-**
**(Chief Administrative Officer)**
**District Court, Belagavi.**

दैनिक महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● बुधवार, दि. ०६ ऑगस्ट २०२५ ● पान ४

## थोडक्यात

### अल्पसंख्याक कल्याण समितीवर सदस्यत्वासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

अल्पसंख्याक समाजाच्या सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक उन्नतीसाठी तसेच स्थानिक अल्पसंख्याकांच्या समस्या सोडवण्यासाठी जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समिती स्थापन करण्याचा निर्णय शासनाकडून घेण्यात आला आहे. जिल्हास्तरीय अल्पसंख्याक कल्याण समितीवर शासकीय अधिकारी, त्या-त्या जिल्ह्याचे राज्यसभा लोकसभा सदस्य तसेच विधानसभा सदस्य, स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी यांच्यासह अल्पसंख्याकांसाठी काम करणाऱ्या ०३ नामवंत संस्थांचे अशासकीय प्रतिनिधी यांना या आगोदर अर्ज, करण्यासाठी २० डिसेंबर २०२४ रोजी प्रसिध्दी देण्यात आली होती. कमी प्रमाणात अर्ज आलेले असल्यामुळे नवीन अर्ज करणाऱ्यां उमेदवाराला परत एकदा संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यानुसार या आगोदर अर्ज करण्यात आलेल्या उमेदवाराला परत अर्ज करण्याची आवश्यकता नाही. सदर समितीवर अल्पसंख्यांकांसाठी काम करणाऱ्या ०३ नामवंत संस्थांचे अशासकीय प्रतिनिधी सदस्य असणार आहेत. त्यानुषंगाने अल्पसंख्याकांसाठी काम करणाऱ्या ०३ नामवंत स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी यांचे नामनिर्देशने शासनास सादर करण्याकरीता, १५.०४.२०१७ मध्ये दिलेल्या दिशानिर्देशास अनुसरून आपले अर्ज / प्रस्ताव १४ ऑगस्ट २०२५ पर्यंत विहीत नमुन्यात सादर करण्याचे आवाहन जिल्हा नियोजन कार्यालय, बीड यांनी केले आहे. इच्छुक उमेदवाराकडून सादर करण्यात येणाऱ्या अर्जात, प्रस्तावात पुढील बाबींचा समावेश असणे आवश्यक आहे. नाव, पत्ता, जन्मतारीख, व्यवसाय, शिक्षण, मोबाईल नंबर, ई-मेल आयडी. अल्पसंख्याकांसाठी काम करणाऱ्या नामवंत समाजसेवी संस्थाचे प्रतिनिधी असल्याचे प्रमाणपत्र. (संस्थेच्या कार्यकारी मंडळाच्या स्वाक्षरीने अधिकृत),अल्पसंख्याक समाजाच्या विकासासाठी करण्यात आलेल्या सामाजिक कार्याची माहिती.

### प्रधानमंत्री पीक विमा योजनेस 30 ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

**बीड । प्रतिनिधी**

प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम २०२५ मध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजना बीड जिल्हयांत राबविण्यात येत असून या योजनेत कर्जदार व बिगर कर्जदार शेतक-यांनी सहभाग घेण्याची अंतिम मुदत दिनांक ३१ जुलै, २०२५ अशी होती. बीड गत वर्षीच्या तुलनेत कमी सहभागी, शेतकऱ्यांकडे सीळडींरलज्ञ फार्मर आय डी नसणे, झचत्रध पोर्टल सेवेतील व्यत्यय आधार (णखऊख) व उडउ सर्व्हरवरील व्यत्यय राज्याच्या पोर्टलच्या तांत्रिक/सेवेतील व्यत्याय इत्यादीमुळे शेतकऱ्यांना योजनेत सहभागावर होणारा परिणाम लक्षात घेऊन केंद्र शासनाने दि. ०१ ऑगस्ट, २०२५ रोजीच्या पत्रातील निर्देशानुसार योजनेत बिगर कर्जदार शेतकऱ्यांना सहभागी होण्यासाठी १४ ऑगस्ट, २०२५ कर्जदार शेतकऱ्यांना ३० ऑगस्ट, २०२५ पर्यंत विशेष बाब म्हणून मुदतवाढीस मान्यता दिली आहे. तरी जिल्ह्यातील विमा भरण्यापासून वंचित राहिलेल्या सर्व बिगर कर्जदार शेतकरी बांधवांनी तात्काळ आपल्या पिकाचा विमा १४ ऑगस्ट २०२५ पूर्वी आणि कर्जदार शेतकरी यांनी ३० ऑगस्ट २०२५ पूर्वी भरून घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी केले आहे.

### बोगस विना परवाना खत विक्री करणारे आढळून आल्यस कृषी विभगाशी संपर्क साधावा

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन,विभागीय कृषी सहसंचालक प्रकाश देशमुख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे,आशिष काळूसे, तंत्र अधिकारी गु.नि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हास्तरीय भरारी पथक प्रमुख साहिल सय्यद, कृषी विकास अधिकारी जिल्हा परिषद बीड, सायप्पा गरांडे, मोहीम अधिकारी जिल्हा परिषद बीड, वल्लभ भोसले जिल्हा गुण नियंत्रण निरिक्षक, यांच्या उपस्थीतीत आणि सर्वांच्या प्रयत्नाने कृषी अधिकारी (गुण नियंत्रण) तालुका कृषी अधिकारी कवडे एम. बी, माजलगाव यांनी अनधिकृत रित्या विना पावती, बोगस खत विक्री करणाऱ्या जगदंबा कृषी सेवा केंद्र पाथरुड आणि जगदंबा ॲग्रो एजन्सी लामानवाडी ता.माजलगाव यांच्या विरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३, अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ व खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतुदी अन्वये माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन येथे दि ०४ ऑगस्ट २०२५ रोजी पहाटे २:१० वा. गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदरील ठिकाणाहून बोगस खताच्या वापरलेल्या (रिकाम्या) २३, सीलबंद १३ व अर्धवट ०३ अशा एकूण ३९ बोगस खताच्या बॅग जप्त करून संबंधित पोलीस स्टेशन यांच्या ताब्यात देण्यात आलेला आहे. अशा प्रकारे कुणीही बोगस विना परवाना, अनधिकृत कृषी निविष्ठा विक्री होत असल्यास कृषी विभागास संपर्क साधावा, असे आवाहन कृषी विभागाच्या भरारी पथकाने केले आहे.

### राजमाता जिजाऊ महाविद्यालया मध्ये किशोरवयीन मुलींसाठी विशेष मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचालित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये हेल्थ अँड हायजिन समिती व लैंगिक अत्याचार प्रतिबंधक समिती अंतर्गत किशोरवयीन मुलींसाठी विशेष मार्गदर्शन प्रसंगी श्री. प्रेमानंद स्वामी यांनी जीवनामध्ये वैयक्तिक स्वच्छता कशी राखता येईल यावर सविस्तर माहिती दिली. श्री. वाडेकर राहुल यांनी आहार व मासिक पाळी यावर मार्गदर्शन करताना योग्य वेळी योग्य आहार घेतल्यास शरीर तनदुरुस्त राहते यासाठी मौलिक सल्ले सांगितले. महिला दक्षता पोलीस समिती सदस्य निकिता तिडके यांनी बालविवाह एक सामाजिक अभिशाप या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बालविवाहाचे दुष्परिणाम विद्यार्थिनींना समजावून दिले. तसेच आपल्या आजूबाजूला बालविवाहासारखे प्रकार घडत असतील तर तात्काळ पोलीस स्टेशन व सामाजिक संस्थांना याची कल्पना द्यावी असे आवाहन केले. याप्रसंगी विद्यार्थिनींनी आपल्या मनातील शंका विचारून निरसन करून घेतले. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी या मार्गदर्शनपर कार्यक्रमाच्या माध्यमातून मिळालेली माहिती प्रत्येक विद्यार्थिनीने जीवनात उपयोगात आणावी असे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लैंगिक अत्याचार प्रतिबंधक समितीच्या प्रमुख डॉ. स्मिता बसोले यांनी केले. याप्रसंगी विचार मंचावर उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, कार्यालय अधीक्षक सुभाष वायाळ, डॉ. नितीन कुंभार, डॉ. स्मिता बसोले यांबरोबरच महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला.

# बाबांवर असलेल्या निष्ठेमुळेच गोरक्षनाथ टेकडीचे वैभव: शेवाळे महाराज







### ● हरी नामाने अवघी गोरक्षनाथ टेकडी दुमदुमली

**बीड । प्रतिनिधी**

महान संत किसन बाबा महाराज, गुरुवर्य नवनाथ बाबा महाराज यांच्यावर भाविकांचे अफाटनिष्ठा आणि श्रद्धा आहे या निष्ठेमुळेच गोरक्षनाथ टेकडीचे वैभव टिकून असल्याचे गौरव उद्गार शंकर महाराज शेवाळे यांनी काढले.

विसाव्या शतकातील महान सद्गुरू संत किसन बाबा महाराज यांच्या २७ व्या पुण्यस्मरणार्थी गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे. या अखंड हरिनाम सप्ताह मध्ये सोमवार सायंकाळी कीर्तन सेवा ह.भ.प.शंकर महाराज शेवाळे यांनी समर्पित करताना संत निळोबा महाराज यांचा धन्य त्यांची तयां माय प्रसवली।

ज्यांची निष्ठा जडली विठ्ठल रुपीं ।।१।।<br>
विठ्ठल आसनीं विठ्ठल भोजनीं ।<br>
विठ्ठल शयनीं न विसंबती ।।२।।<br>
त्यांचे सर्व काम पूर्ण मनोरथ ।<br>
करिल हा नाथ पंढरिचा ।।३।।<br>
निळा म्हणे ज्यांचा हेत पांडुरंगीं ।<br>
रंगले ते जगीं धन्य जाले ।।४।।

अभंग घेतला याचे विवेचन करताना पांडुरंगावर निष्ठा असावी जाळी स्थळी काष्ठी पाषाणी सर्वत्र पांडुरंग दिसावा संत निळोबा महाराज यांनी पांडुरंगावर अनंत निष्ठा ठेवली तशी निष्ठा सर्वांनी गोरक्षनाथ टेकडी येथे ▶ उर्वरित पान २ वर

#### ● वैराग्याचा वारसा

**गोरक्षनाथ टेकडी हि गुरू शिष्य परंपरेचा वारसा चालवणारी तपोभूमी आहे. गुरू गोरक्षनाथ बाबा गुरू मच्छिंद्रनाथ बाबा पासून संत गुरू साधू महाराज, गुरू किसन बाबा महाराज आणि आत्ता गुरुवर्य शांतीब्रह नवनाथ बाबा महाराज हि नवनाथ पंथातील गुरू शिष्य परंपरेचा वारसा आहे. गुरू गोरक्षनाथ बाबा पासून गुरू नवनाथ बाबा महाराज यांच्या पर्यंत वैराग्याचा वारसा चालवणारी गादी आहे.**

## श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी सप्ताह निमित्त ५ दिवस जि.प. आरोग्य विभागाकडून भाविक फक्तना मोफत आरोग्य तपासणी

### पहिल्याच दिवशी २१५ भाविक भक्तांनी आरोग्य सेवेचा घेतला लाभ

**बीड । प्रतिनिधी**

श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी संस्थान येथे साप्ताहनिमित दररोज हजारी भाविक भक्त येत असतात. यातील बहुतांश भाविक भक्त मुक्कामीच असतात. या भाविक भक्तांना आरोग्य विषयक समस्या निराकरण करण्यासाठी आरोग्य टीम पूर्णवेळ असणे आवश्यक होते याच अनुषंगाने संचालक धनंजय गुंदेकर



यांनी जिल्हा आरोग्य अधिकारी श्री उल्हास गंडाळ यांच्याकडे आरोग्य टीम उपलब्ध करण्याची मागणी पत्राद्वारे केली होती.

या मागणीची दखल घेत श्री उल्हास गंडाळ यांनी तालुका आरोग्य अधिकारी यांना सूचना देत नाळवंडी प्राथमिक आरोग्य केंद्राची टीम श्री क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ▶ उर्वरित पान २ वर

## अडचणीत सापडलेल्या गौशाळांना तत्काळ मदत द्यावी

### पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडे आ. नमिता मुंदडा यांची मागणी

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राज्यात सध्या कुरेशी समाजाच्या बंदमुळे शेतकरी आणि पशुपालक मोठ्या अडचणीत सापडले आहेत. जनावरांची खरेदी-विक्री ठप्प असल्याने जनावरांच्या चाऱ्याचा आणि देखभालीचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर आमदार नमिता अक्षय मुंदडा यांनी राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्याकडे तातडीने गौशाळांना आणि पांजरापोल संस्थांना आर्थिक मदत मंजूर करण्याची मागणी केली आहे.

जय हिंद गोरक्षण गौशाळा, कानडीमाळी ता. केज या संस्थेच्या वतीने आलेल्या निवेदनाच्या आधारे आमदार मुंदडा यांनी पशुसंवर्धन ▶ उर्वरित पान २ वर

## अतिक्रमण धारकास पि.टी.आर वाटपात भेदभाव करु नका : बाळराजे पवार

### सरसकट अतिक्रमण धारकाना पि.टी.आर वाटप करण्यात येणार: मुख्याधिकारी विक्रम मांडुकरे

**गेवराई । प्रतिनिधी**

पंतप्रधान घरकुल आवास योजनेंतर्गत घरकुलासाठी महाराष्ट्र सरकारने २०१८ ला शासननिर्णय केला होता त्या नंतर गेवराईचे मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार यांनी तात्काळ शासन निर्णयाची अंमलबजावणी करुन संजयनगर साठेनगर येथील अतिक्रमण धारकास १५ ऑगस्ट २०२१ रोजी पि.टी.आर वाटप करण्यात आले



होते त्यावेळेस संजयनगर येथील शासकीय जागेवरील आरक्षण असलेल्या अतिक्रमण धारकास सोडुन संजयनगर येथील २०७ अतिक्रमण धारकास तर साठेनगर येथील ▶ उर्वरित पान २ वर

## अधिका-यांच्या हेकेखोरपणामुळे माजलगाव तालुक्यात रेशीम उद्योग शेतीची लागली वाट

### २०२१ - २०२२ पासुनचे अनुदान मिळण्यासाठी शेतकऱ्यांचा आंदोलनाचा इशारा: जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**माजलगाव । प्रतिनिधी**

देशातील शेतकरी हा रेशीम उद्योग शेतीकडे वळावा व कमी खर्चामध्ये शेतक-यांना चांगले उत्पादन मिळावे यासाठी केंद्र सरकारने रेशीम उद्योग शेतीसाठी अनुदानाची योजना राबविली त्यासाठी माजलगाव तालुक्यात नित्रुड या गावातील पंधरा ते सोळा शेतक-यांनी रेशीम शेती सुरू केली. यामध्ये शिवराज धर्मराज फाटे या शेतक-याने अनेक पुरस्कार प्राप्त केले. माजलगाव तालुक्यात रेशीम शेती उद्योगात हजारो शेतक-यांचा सहभाग होवुन प्रचंड उत्पादन वाढले असते परंतु अधिका-यांच्या हेकेखोरपणामुळे शासनाचे कुशल बील अनुदान दोन वर्षांपासुन न दिल्याने शेतकरी ▶ उर्वरित पान २ वर

# शेतकऱ्यांच्या सेवेत महसूल विभाग सदैव तत्पर: मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ - शेळके

### पारगाव शिरस मंडळ विभागातील महसूल सप्ताह उत्साहात साजरा ; शेतकऱ्यांमध्ये समाधान

**बीड । प्रतिनिधी**

१ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट दरम्यान राज्यभरात महसूल विभागाचा ‘ महसूल सप्ताह ’ उत्साहात साजरा होत आहे . या सप्ताहाचे औचित्य साधून बीड तालुक्यातील पारगाव शिरस मंडळ विभागात दिनांक ४ ऑगस्ट रोजी छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले . हे शिबिर मौजे साक्षाळपिंपरी येथे मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ - शेळके यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले .

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या सूचनेनुसार आणि जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांचे आदेश तसेच तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनात हा उपक्रम पार पडला . या शिबिरात पारगाव शिरस मंडळातील १३ गावांचा एकत्रित सहभाग होता . यात पारगाव शिरस , तांदळवाडी भिल्ल , शहाबाजपूर , साक्षाळपिंपरी , बहादरपूर , सोनगाव , केतुरा , रुद्रापूर , कुमशी , सौंदाना , खापरपांगरी , उमरद जहागीर व पिंपरगव्हाण या गावांचा समावेश आहे.

महसूल विभागाची आपल्या दारी संकल्पना : या शिबिराचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख , गतिमान व कार्यक्षम बनवणे . प्रशासन आपल्या दारी ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवून शेतकऱ्यांचे विविध प्रश्न आणि योजनांशी संबंधित समस्या थेट गावातच मार्गी लावण्यावर भर देण्यात आला .



शिबिराची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून झाली . यावेळी उपस्थित शेतकऱ्यांशी संवाद साधताना मंडळ अधिकारी स्मिता गुंजाळ - शेळके यांनी ई पीक पाहणी ४.०.० प संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले . त्यांनी स्पष्ट केले की खरीप हंगामासाठी १ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर या कालावधीत शेतकऱ्यांनी मोबाईल ॲपद्वारे स्वतःच बांधावर जाऊन पीक पाहणी नोंद करावी . फार्मर आयडीचे महत्त्व अधोरेखित करत त्यांनी आवाहन केले की , अजूनही ज्या शेतकऱ्यांनी फार्मर आयडी घेतले नाही, त्यांनी तो त्वरित काढावा , कारण अनेक कृषी व शासकीय योजनांसाठी याची आवश्यकता भासते .

योजनांचे लाभ व प्रमाणपत्रांचे वितरण : या शिबिरात संजय गांधी निराधार योजना , श्रावणबाळ सेवा योजना व राज्य निवृत्तीवेतन योजना अंतर्गत लाभार्थ्यांना मंजुरी आदेश वितरित करण्यात आले . त्यासोबतच विविध प्रकारचे दाखले व प्रमाणपत्रांचे वितरणही करण्यात आले . गौरव व सत्कार : याच कार्यक्रमात बीड उपविभागातून ‘ आदर्श ग्राम महसूल अधिकारी ’ म्हणून साक्षाळपिंपरी येथील ग्राम महसूल अधिकारी यशवंत सानप यांना नुकतेच १ ऑगस्ट रोजी सन्मानित करण्यात आले . त्यानिमित्त महसूल मंडळ आणि ▶ उर्वरित पान २ वर